**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक 26.5.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 84 -** अमरावती महानगरपालिके तर्फे चालविण्यात येत असलेला शहर बस उपक्रमाकरिता खाजगी अभिकर्ता नेमणूकी बाबत ई-निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे दरास व करारनामा करण्यास मंजुरात प्रदान करणे बाबत.

**ठराव क्रमांक 84 -** जुने शहर बस अभिकर्ता श्री.विपिन चव्हाण यांनी वारंवार करारनामाचे उल्लंघन केल्यामुळे श्री.विपिन चव्हाण यांचेसोबतचा करारनामा रद्द करून तसेच सर्व शहर बसेस जप्त करून शहर बस उपक्रमाकरिता नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून खाजगी अभिकर्ता यांची नियुक्ती करणेकरिता मा.आयुक्त यांनी दि.०३/०३/२०२३ रोजी मंजुरात प्रदान केली आहे.

त्यानुसार शहर बस उपक्रम चालविणेकरिता खाजगी अभिकर्ता यांची नियुक्ती करणेकरिता दि. ०४/०३/२०२३ रोजी अत्यावश्यक बाब असल्यामुळे अल्प मुदतीची ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. सदर ई-निविदा भरण्याची अंतिम दि. ०९/०३/२०२३ होती. अंतिम दिवशी एकूण तिन निविदा प्राप्त झाल्यात. त्यामुळे दि. १०/०३/२०२३ रोजी तिनही निविदांचे तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. त्यामध्ये तिनही निविदा धारक पात्र ठरल्यामुळे दि. ११/०३/२०२३ रोजी तिनही निविदा धारकांचे वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. त्यामध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| १. मेघा ट्रॅव्हल्स | - | रु.५.२२/- प्रती कि.मी. |
| २. साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स | - | रु.५.२३/- प्रती कि.मी. |
| ३. वर्कग्रुप सु.बे.नाग.से.सह.संस्था | - | रु.४.७०/- प्रती कि.मी. |

वरीलपैकी साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे दर रु.५.२३/- प्रती कि.मी. सर्वात जास्त असल्यामुळे शहर बस उपक्रम चालविणेकरिता खाजगी अभिकर्ता म्हणून साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांची नियुक्ती करणेकरिता मा.आयुक्त यांनी दि. ११/०३/२०२३ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

त्यामुळे नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे दर रु.५.२३/- प्रती कि.मी. यांस तसेच त्यांचेसोबत खालील अटी व शर्ती नुसार करारनामा करण्यास मा.सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर.

## करारनामातील अटी व शर्ती

१.श्री.विपिन चव्हाण, शहर बस अभिकर्ता यांचेसोबत दिनांक ०५/०३/२०१६ रोजी केलेल्या करारनामातील सर्व अटी व शर्ती आपणास लागू राहतील.त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

२.शहर बस संदर्भातील सर्व कर्जावरील मूळ रक्कम,व्याज व इतर दंडाच्या रक्कमेचे पुढील उर्वरित कालावधीकरिता एकूण कर्जाचे रक्कमेचे पुनर्रचना (Restructure of Loan) करून व मासिक EMI चे हफ्ते बँकेकडून ठरवून त्याची परतफेड करण्याची जबाबदारी साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांची राहील.

३.अमरावती महानगरपालिकेस नवीन बसेस खरेदी करावयाची आवश्यकता भासल्यास आपणास ती अमरावती महानगरपालिकेच्या नावाने खरेदी करावी लागेल व त्याकरिता घेण्यात येणाऱ्या कर्जाकरिता अमरावती महानगरपालिका हमी घेणार नाही. तसेच नवीन शहर बसेस खरेदी केल्यास नवीन बस पुरता कंत्राटाचा कालावधी आपणास वाढवून देण्यात येईल.

४.अमरावती महानगरपालिकेकडे रु.५ लक्ष प्रती वर्ष याप्रमाणे उर्वरित कंत्राट कालावधीकरिता बँक ग्यारंटी जमा करावी लागेल.

५.अमरावती महानगरपालीकेसोबत करार झाल्यास तो दिनांक ५/३/२०१६ चे करारनामानुसार उर्वरित कालावधी करिता वैध राहील.

६.शहर बसेस चे संबंधित सर्व खर्च उदा. विमा,पी.यु.सी.,कर व पासिंग करिता लागणारा व इतर सर्व खर्च साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांना नवीन करारनामा झाल्याचे दिनांकापासून करावा लागेल. तसेच शहर बस उपक्रमातील शहर बसेसचे दुरुस्ती करिता अंदाजित रु.२० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च दरमहा अदा करावयाचे रॉयल्टी रक्कमेमधून वजा करून उर्वरित रक्कम मनपास अदा करावी लागेल.

७.शहर बस उभी करणेकरिता अमरावती महानगरपालिकेतर्फे जागा उपलब्ध करून दिल्यास नियमानुसार जागेचे भाडे अदा करावे लागेल.

८.शहर बस उपक्रमातील कर्मचाऱ्यांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन,ई.पी.एफ.,ई.एस.आय.सी.व नियमानुसार इतर भत्ते नवीन करारनामा झाल्याचे दिनांकापासून साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांना अदा करावे लागतील. तसेच कामगाराबाबत शासन निर्देशानुसार कार्यवाही आपणामार्फत होणे अपेक्षित आहे.

९.शहर बस ची रॉयल्टी जुने दरानुसार दर महिन्याचे सात तारखेचे आत जमा करावी लागेल.

१०.शहर बस वरील जाहिरातीचे जाहिरात कर अमरावती महानगरपालिकेकडे जमा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

११.शहर बस उपक्रमातील तिकीट छपाई खर्च तसेच स्टेशनरी व इतर खर्च साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांना करावा लागेल.

१२.साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांना रॉयल्टी अथवा कोणत्याही दरामध्ये रिबेट अथवा सवलत मिळणार नाही.

१३.साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांना मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचेकडून मान्यता असलेल्या मार्गावरच बसेस चालवाव्या लागतील व ठरवून दिलेल्या तिकीट दरानुसारच तिकीट वसूल करावे लागेल.त्यात होणारे वेळोवेळीचे बदल साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांना मान्य राहतील.

१४.शहर बस कंत्राट संपुष्टात आल्यानंतर बसेसची मालकी नवीन अभिकर्ता साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे नावाने हस्तांतरित करून देण्यात येईल.

१५.शहर बसेस चे अपघात झाल्यास किंवा भविष्यात मा.न्यायालय मार्फत दंडात्मक कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नवीन करारनामा झाल्याचे दिनांकापासून साहू टुर्स अँड ट्रॅव्हल्स यांची राहील.

१६.अमरावती महानगरपालिकेतर्फे शहर बस उपक्रमासंदर्भात कोणत्याही प्रकारचा खर्च करण्यात येणार नाही.

१७. मा.आयुक्त यांचे दालना लगतच्या बैठक सभागृहामध्ये आयोजित दि. १९/०५/२०२३ रोजीची बैठकीमध्ये मा.आयुक्त ,बैक ऑफ महाराष्ट्र चे प्रतिनिधी व साहू टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांनी मान्यता दिल्यानुसार अमरावती महानगरपालिकेव्दारे बैक ऑफ महाराष्ट्र यांचेकडे जमा करण्यात येत असलेली एकुण थकीत रक्कम रु. २.४२ कोटीचे २०% रक्कम रु. ४८,४०,०००/- साहू टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स टप्प्या टप्प्याने अमरावती महानगरपालिकेकडे कंत्राट संपुष्टात येण्यापुर्वी भरणा करेल.

उपरोक्त प्रशासकीय विषय तसेच करारनामा मा.सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास व करारनाम्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती